क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३१५ दिनांक ०१ / ११ / २०१०

विषय : डोळयांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता सदर आजार सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील विहित आजारामध्ये समाविष्ट करण्याबाबत.

.......

डोळयांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता सदर आजार सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील विहित आजारामध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन होता.

आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन सा.आ.क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता विहित केलेल्या आजारांमध्ये डोळयांचा मोतीबिंदू हा आजार समाविष्ट करण्यास व त्यावरील उपचार/शस्त्रक्रियेकरिता झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील कर्मचाऱ्याने त्याच्या डोळयांवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया शासकीय / निमशासकीय रुग्णालये व कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये करुन घेतल्यास झालेल्या एकूण वैद्यकीय खर्चाची १०० % प्रतिपुर्ती प्रदान करावी.

२) सदर शस्त्रक्रिया कर्मचाऱ्याने खाजगी रुग्णालयात करून घेतल्यास झालेल्या एकूण वैद्यकीय खर्चाची २५ % प्रतिपुर्ती प्रदान करावी.

२. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

१/११/२०१०
*( विजय भि. बागुल )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Hospitals\Adm.Cir.Cataract Operation.doc*
*01/11/10*